International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# छत्रपती संभाजी महाराजावरील ऐतिहासिक लिखानाचा अभ्यास

**रंगराव बाजीराव साळुंके**
छ.शिवाजी विद्यालय दांडेगाव
**Corresponding Author: रंगराव बाजीराव साळुंके**
**DOI- 10.5281/zenodo.14650036**

**सारांश :-**

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारतात इस्लामी राजसत्तेचा उदय झाला होता. मोगल बादशाही प्रबळ राजसत्ता म्हणून समोर आली होती.दक्षीण भारतामध्ये बहामनी साम्राज्याचे विघटन होउन पाच इस्लामी राजसत्ता निर्माण झाल्या, यामध्ये विजापूरीची आदिलशाही, गोळकोड्यांची कुतुबशाही, अहमदनगर ची निजामशाही, बिदरची बरीदशाही, वऱ्हाडची इमादशाही इ. अशा इस्लामी राजसत्ता दक्षिण भारतामध्ये राज्य करत असत. या सत्तेला काही काळ विजयनगरच्या साम्राज्याने आव्हान दिले, परंतु नंतरच्या काळामध्ये विजयनगरचे साम्राज्य लयाला गेले संपूर्ण भारतावर इस्लामी राजसत्तेचा अमल सुरू झाला. शहाजीराजे भोसले हे अदिलशाही सरदार होते. त्यांच्या मनात स्वराज्याची संकल्पना होती. या संकल्पनेच्या सिद्धीसाठी त्यांनी प्रयत्न केले. परंतु त्यांना स्वराज्य उभारणीमध्ये यश आले नाही. स्वराज्याची संकल्पना सत्यात उतरवण्याचे काम त्यांचे सुपुत्र शिवाजी महाराज यांनी केले. हिंदवी स्वराज्याची स्थापना शिवाजी महाराज यांनी केली. शिवाजी महाराज स्वराज्याचे पहिले छत्रपती झाले. छत्रपती पदाला वैधानिक दर्जा मिळावा म्हणुन शिवाजी महाराज यांनी वैदिक पद्धतीने व शाक्त पद्धतीने दोन राज्यभिषेक करून घेतले. यावेळी इ. स. १६७४ मध्ये संभाजी महाराज यांना युवराज म्हणून नियुक्त केले, तर महाराणी म्हणून सोयराबाईचा राज्याभिषेक केला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याचे पहिले युवराज व दुसरे छत्रपती म्हणून संभाजी महाराज गादिवर आरूढ झाले. छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्यांचा कारभार इ. स. १६८० मध्ये हाती घेतला. इ. स. १६८० ते इ. स. १६८९ पर्यंत छत्रपती म्हणुन संभाजी महाराजांनी स्वराज्यांचा कारभार पाहीला होता व त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. पहिले युवराज असतांना सुद्धा स्वराज्याचे दुसरे छत्रपती होण्यासाठी स्वकीयांशी संघर्ष करावा लागला. छत्रपती पदी विराजमान झाल्या नंतर सुद्धा परकीय आक्रमका बरोबर स्वकीय लोकासोबत संघर्ष करावा लागला. एवढेच नाही तर त्यांनी मृत्यु सोबत सुद्धा संघर्ष केला. म्हणून छत्रपती संभाजी महाराज स्वराज्याचे खरे ''संघर्षयोध्या'' ठरतात.

**प्रस्तावना:-**

छत्रपती संभाजी महाराज यांचे जिवन संघर्षमय होते. स्वराज्याच्या रक्षणासाठी आयुष्य झिजले, या महान स्वराज्य रक्षक संघर्षयौध्दा छत्रपती संभाजी महाराजांच्या चरीत्राला न्याय मिळाला का? इतिहासकारांनी संभाजी महारांजाच्या चरित्राचे लिखान न्याय बुद्धीने केले आहे का? इ. प्रश्न उपस्थित होतात. संभाजी महाराजांची कारकिर्द वादळी ठरली. तसेच त्यांच्या चरित्राचे लिखान सुद्धा वादळी ठरले आहे. अनेक चारित्रकारानी पुराव्याची शाहनिशा न करता हवे तसे संभाजी महाराज रेखाटले आहेत. काही इतिहासकारांनी पूर्वग्रहातून संभाजी महाराजांच्या चरित्रावर आरोप केले.या आरोपाचे खंडन काही इतिहासकारांनी केले. यामुळे संभाजी महाराजांच्या ऐतिहासिक लीखानावर महाराष्ट्रातील ऐतिहासिक लिखानामध्ये वादळ निर्माण झाले. वाद–प्रतिवाद सुरु झाला. दावे प्रतिदावे सुरु झाले. गो.स. सरदेसाई महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेतील महान इतिहास **कार मानले जातात**. रियासतीच्या माध्यमातून मराठ्यांचा संपूर्ण इतिहास सुत्रबद्ध पद्धतीने लिहीणारे मराठीतील एकमेव इतिहासकार आहेत.हे काम आजसुद्धा मराठ्यांच्या इतिहासावर प्रेम असलेला कोणताच इतिहासकार करु शकला नाही. यामुळे त्यांचे मराठ्यांच्या इतिहास लेखनातील स्थान मोठे आहे. पण गो.स. सरदेसाई सारखे महान इतिहास संशोधक संभाजी महाराजांचे जीवन चरित्र लीहतेवेळी जीवन चरित्राचे नावउग्रप्रकृती संभाजी' असे देतात. यांच्या चरित्राचे नाव वाचल्यानंतर संभाजी महाराजांचे जीवन चरित्र वाचायची गरज पडत नाही. सामान्य माणुस संभाजी महाराजांची व्यक्तीरेखा उग्रप्रकृती, रागीट, तामसी, सनकी म्हणून स्वीकारतो. म्हणून सबळ पुराव्याच्या अभावी स्वभाव गुण विशेष रेखाटने उचित ठरणार नाही. एक प्रकारे त्या महापुरुषाच्या चरित्रावर तो अन्याय ठरेल. केवळ गो. स. सरदेसाई नाहीतर अनेक मराठी इतिहासकार अशा लेखनाला बळी पडले आहेत, बखर वाङमयामध्ये रेखाटला गेलेले संभाजी महाराज पुराव्यांची शाहनिशा न करता स्वीकारला गेला आहे.

"संभाजीच्या स्वभावाला विवेक व शांत विचार पारखा होता. अंतर्बाह्य राजकारणाची त्यास चांगली ओळख नव्हती. विश्वासु हेर चतुरस्त्रा सल्लागार यांच्या साहाय्याने शिवाजीने ठिकठिकाणचे राजकारण ओळखुन प्रत्येक डाव टाकीला. परंतु एका कलुषाशिवाय संभाजीने कधी कोणाचा सल्ला चित्ताने ऐकिल्याचे उदाहरण आढळत नाही. अकबर व दुर्गादास हे दोन पराक्रमी पुरुष त्याजकडे धाऊन आले. सर्व हिंदुस्थान व विशेषत: राजपुतस्थान गांधील माश्यांच्या पोळ्याप्रमाणे बादशाहाचा चावा घेण्यास टपले होते. त्यांचेच हे दोन प्रतिनिधी जवळ आले असता सहा वर्षे पावेतो त्यांचा पुरस्कार स्वीकारण्यास संभाजीस सामर्थ्य

किंवा इच्छा झाली नाही, अथवा संधी आली नाही, हाच त्याच्या बुद्धीचा कोतेपणा होय."[१]

हा उतारा गो. स. सरदेसाइ यांच्या 'उग्रप्रकृती संभाजी' या चरित्रातील आहे. असे अनेक उतारे संदर्भ म्हणून देता येतील. संभाजी महाराजांचे चरित्र लीखान करतेवेळी गो. स. सरदेसाई सारखा विदवान इतिहासकार संभाजी महाराजांना आरोपाच्या पिंजऱ्यात उभा करुन तो कसा अकार्यक्षम व दूरदृष्टी नसलेला आहे हे सिद्ध करतात. याच बरोबर संभाजी महाराज यांचा स्वभाव विशेष सांगतेवेळी तो विवेकी नव्हता. शांत नव्हता हे पण सांगतात. गो. स. सरदेसाई चरित्र ग्रंथामध्ये संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा शौर्याचा गौरव सुद्धा केला आहे. पण संपूर्ण चरित्र वाचल्यानंतर अनेक पानावरती कौर्य, विलास, रगेल, रंगेल, व्यवसनाधीनता, दुर्वर्तन, लहरीपणा, अदुरदृष्टी, बेशिस्त, अविवेकी, चंचल, इ. प्रकारची विशेषणे लावल्याचे दिसून येते. चरित्रग्रंथ नावाला साजेसे चरित्र गो. स. सरदेसाई यांनी लिहिले आहे. संपूर्ण चरित्र वाचल्यावर 'उग्रप्रकृती संभाजी' वाचकाच्या मनात तयार होतो. बखर वाङमय इतिहासाचे मुळ साधन मानले जाऊ शकत नाही. बखर वाङमय सोडल्यानंतर अशा प्रकारचे उल्लेख साधनामध्ये सापडत नाहीत. तरी सुद्धा बखर वाङमयाच्या आधारावर संभाजी महाराजांच्या चरित्राचे लिखान सुरुवातीच्या इतिहासकांरानी केले. समकालीन कागदपत्रामध्ये अनेक ठिकाणी संभाजी महाराजांच्या विद्वतेचे, चातुर्याचे, शौर्याचे, दुरदृष्टीच्या निर्णयाचा उल्लेख येतात. पण सरदेसाई यापुराव्याकडे दुर्लक्ष करतात. संभाजी महाराजांची राजकीय जडणघडण शिवाजी महाराजांच्या देखरेखी खाली झाली होती. शिक्षण व संस्कार जिजाऊ साहेबांच्या देखरेखी खाली झाले होते- शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीवेळी संभाजी महाराज सोबत होते. मुगलबादशाहीची मनसबदारी स्वीकारली होती. वयाच्या ९ व्या वर्षी राजकीय जबाबदारी स्वीकारली होती. राजकारणाचे बाळकडू लहानवयातच मिळाले होते. याच अनुभवाच्या जोरावर जीवात जीव असेपर्यंत मोगल सत्ते बरोबर संघर्ष केला. राज्यकारभार व्यवस्थीत केला. त्या संभाजी महाराजांना मानसाची पारख नव्हती, असे समजणे म्हणजेच मनाचा कोतेपणा होय. या उलट इंग्रज स्वराज्याकडे तटस्थपणे पाहत होते. स्वराज्यातील प्रत्येक घडामोडीची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्या पर्यंत पोहचवत होते. ते इंग्रज वरिष्ठांना २० जानेवारी १६७७ च्या पत्रात लिहतात, 'विजापुरकर आपल्याशी सहानुभूतीने वागतात, ते काडीचाही त्रास देत नाहीत. मात्र शिवाजीचे फर्माणाची आम्हास खात्री वाटत नाही. परंतु त्यांची भरभराट होत असून त्याचे राज्य वाढत आहे. त्यामुळे आपल्याच राज्यात तो आमची लुट करील अशी शंका वाटत नाही, त्यांच्या मरणानंतर काळजी करण्याचे कारण नाही. त्यांच्या मुलास अधिकार प्राप्त झाला असून तो बराच समजस आहे.''[२]

वरील उतारा शिवाजी पत्रसार संग्रहातील पत्रामधील आहे. हे पत्र लिहिणारा इंग्रज अधिकारी आहे. या इंग्रज अधिकाऱ्याला संभाजी महाराज समजस किंवा विवेकी वाटतात. पण गो. स. सरदेसाई यांना संभाजी महाराज विवेकी व समजस वाटत नाहीत. या पत्रामध्ये इंग्रज अधिकारी संभाजी महाराजांना समजस म्हणतो. याच बरोबर शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर काहीच फरक पडणार नाही. संभाजी महाराजांना अधिकार मिळाले आहेत. ते राज्यकारभार करण्यास सक्षम आहेत. असे मत व्यक्त करतो. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, संभाजी महाराज विवेकी तर होते. याच बरोबर कार्यक्षम राज्यकर्ते होते. विश्वासु लोकांशिवाय स्वराज्याचा राज्यकारभार करणे शक्य नव्हते. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याचा कारभार नऊ वर्ष व्यवस्थित चालवला आहे. स्वराज्याच्या चारही बाजुने शत्रु असताना सुद्धा स्वराज्याचे प्राणपणाने रक्षण केले. रयतेची काळजी घेतली. गडकोटाचे रक्षण केले. पुढे घडलेल्या इतिहासावरून सिद्ध झाले आहे.

संभाजी महाराजांच्या चरित्राचे लिखान करते वेळी मराठी इतिहासकारांनी बखर वाङ्मयाचा वापर केला आहे. यात महादेव गोविंद रानडे, शेजवलकर, ग्रँड डफ इ. इतिहासकारांचा समावेश होतो. यात महादेव गोविंद रानडे यांनी संभाजी महाराजाविषयी स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही. त्यांनी मराठा सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ लिहून ग्रँड डफ यांच्या अनेक मताचे खंडन केले आहे. हा राष्ट्रीय इतिहासाला प्रोत्साहन देणारा ग्रंथ आहे. ग्रँड डफ या मराठा इतिहासकाराने मराठा सत्तेचा उदय जंगलात लागलेल्या आगी प्रमाणे अचानक झाला आहे, असे मत मांडले. या मताने खंडन करण्यासाठी महादेव गोविंद रानडे यांनी मराठा सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ लिहिला. यात त्यांनी मराठा सत्ता अचानक उदयाला आली नाही तर या मागे मराठी संतांनी विचारांची पेरणी केली. मराठा सत्तेला संतांच्या विचाराचे वैचारिक अधिष्ठान होते. संताच्या प्रचारामुळे मराठी मन स्वराज्यासाठी तयार झाले होते. सामाजिक व धार्मिक अधिष्ठान निर्माण झाले होते. शिवाजी महाराजांनी याच वैचारिक आधारावर राजकीय स्वराज्य निर्माण केले. हे लिहित असताना रानडे संभाजी महाराजांच्या विषयी मत मांडतात. "त्याने आपल्या यशाचा केलेला दुरूपयोग देशावर येऊ घातलेल्या संकटांशी झगडताना तो पुढारी होण्याच्या लायकीचा नाही हेच सिद्ध करणारा होता.''[३] असे अनेक संदर्भ लिखानामध्ये येतात. रानडे सुरूवातीच्या इतिहासकारासारखे संभाजी महाराजाविषयी मत मांडतात.

संभाजी महाराज क्रूर होते. संभाजी महाराज नेतृत्त्व करण्यास लायक नव्हते. स्वकीयांच्या क्रूर हत्या केल्या. अशा प्रकारची मते मांडतात. मुळात मराठी इतिहासकारासमोर बखरकारांनी मांडलेला संभाजी होता. बखर वाङ्मय हे ऐतिहासिक साधन ठरू शकत नाही. यात काही प्रमाणात ऐतिहासिक अंश असला तरी इतिहास ठरू शकत नाही. रानडे यांना संभाजी महाराज मराठा सत्तेचे नेतृत्त्व करण्यास लायक वाटत नसले तरी संभाजी महाराजांनी मराठा सत्तेचे समर्थपणे नेतृत्त्व केले आहे. शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याचे रक्षण केले. वर उल्लेख केल्याप्रमाणे इंग्रज संभाजी महाराजांना नेतृत्त्व करण्यास सक्षम मानत होते. इंग्रजांच्या पत्र व्यवहारावरून सिद्ध होते की, संभाजी महाराज स्वराज्याचा राज्यकारभार व्यवस्थित चालवत होते. शेवटपर्यंत संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर परकीय शत्रुला प्रबळ होऊ दिले नाही. मराठी राज्याचे नेतृत्त्व समर्थपणे केले. इंगज, डच,सिद्धी, पोर्तुगीज या सत्तांना नियंत्रनात ठेवले. या परकीय सत्तावर शिवाजी महाराजांच्या काळापेक्षा जास्त वचक निर्माण केला. राज्यकारभार करतेवेळी परकीय सत्तावर शक्तीच्या बळावर वचक निर्माण करावा लागतो. तो संभाजी महाराजांनी केला. स्वकीय रयतेसोबत संभाजी महाराजांनी क्रूर पणाकेल्याचा उल्लेख सापडत नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी प्रत्येकासोबत न्यायबुद्धीने व्यवहार केला. अनेक सहकारी

विषप्रयोग कटामध्ये सहभागी असतांना सुद्धा त्यांना अभय देऊन संयम दाखवला. संयमी वृत्ती संभाजी महाराजामध्ये होती. अनेकवेळा कटात सहभागी असल्याचे सिद्ध झाल्यावर शासन केले. स्वराज्याच्या छत्रपतीच्या विरोधात हत्येचा कट होत असेल तर शासन होणे आवश्यक होते. शासन छत्रपती संभाजी महाराजांनी केले.

शिक्षा केली म्हणून छत्रपती संभाजी महाराज नेतृत्त्व करण्यास योग्य ठरत नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरते. छत्रपती शिवाजी महाराजानंतर मराठ्यांच्या इतिहासामध्ये संभाजी महाराजासारखे नेतृत्त्व तयार झाले नाही. संभाजी महाराजांच्या पराक्रमाने स्वराज्यातील सैन्य व रयतेने संभाजी महाराजांचे नेतृत्त्व मान्य केले होते. मोगल बादशाहिशी लढा चालूच ठेवला होता. औरंगजेबाशी सामना करते वेळी बलाढ्य शक्तीची भीती बाळगली नाही. मनुची म्हणतो की, ''औरंगजेब दक्षिणेकडे येण्यास निघाला आहे. ही बातमी मीळून सुद्धा संभाजीने चारी दिशेला लुटालुट करण्याचे सोडले नाही. त्या बलाढ्या मोगल सैनेला आपण किती शुद्र लेखतो, हे दाखविण्याचा त्यांचा हेतु होता. आम्ही बुऱ्हाणपूरला पोहचण्यापूर्वीच बादशहाच्या तळापासून ५–७ मैलावर असलेले एक संपन्न गाव त्यांनी (संभाजीनी) उद्ध्वस्त केले होते.''[४] संभाजी महाराज धाडसी व पराक्रमी होते यात दुमत नाही. बलाढ्य सत्तेसोबत लढत असताना सैन्याला नेतृत्वावर विश्वास असावा लागतो. तरच नेतृत्त्व मोगली सत्तेसारख्या बलाढ्य सैन्याविरोधात लढू शकते. संभाजी महाराजांच्या नेतृत्त्वावर सैन्याला पूर्ण विश्वास होता. म्हणून संभाजी महाराज औरंगजेबाच्या छावणी जवळील गावापर्यंत धड़क मारत होते. शिवाजी महाराजांच्या आयुष्यामध्ये कितीही संकटे आले तरी शिवाजी महाराज डगमगले नाहीत. अफजलखान प्रकरण, सिद्धी जोहरचा वेडा, शाहीस्तेखान प्रकरण इत्यादी अनेक प्रकरणाचा सामना शिवाजी महाराजांनी निर्भयपणे केला. तोच वारसा घेऊन संभाजी महाराज मोगलांच्या विरोधात लढले. मोगलांच्या साम्राज्यात जाऊन लढले. यावरून संभाजी महाराजांचा पराक्रमी गुण लक्षात येतो. त्यांच्यावर सैन्याचा विश्वास स्पष्टपणे दिसतो. संभाजी महाराजांचा वारसा हक्क, त्यांच्यावरील रयतेचे प्रेम व सैन्याचा विश्वास या संदर्भात प्रसिद्ध इतिहास संशोधक कमल गोखले म्हणतात, ''सैन्यात संभाजी राजे लोकप्रिय होते. सारी प्रजाही त्यांच्या बाजुची होती. त्यांच्या वारसाहक्काच्या आड येणाऱ्या आणि त्यांना कैद करण्याचे कारस्थान मंडळींना संभाजीमहाराजांनी अटकेत टाकले या अशा प्रकारच्या परिस्थितीत कोणताही शासनकर्ता जे करील तेच संभाजीनी केले तसेच म्हणावेसे वाटते.''[५] गो. स. सरदेसाई यांना रागाच्या भरात क्रूर क्रत्य केल्याचे वाटते. पण ते असत्य आहे. संभाजी महाराजांच्या हत्येचा कट उघड झाल्यानंतर सुद्धा ते संयमाने वागले. संभाजी महाराज मेहनती व सावध असल्याचे लोक बोलतात.[६] असा उल्लेख समकालीन साधनामध्ये आला आहे. याचबरोबर संभाजी महाराज समजुतदार असून आपल्या कंपनीला त्यांच्यापासून त्रास पोचणार नाही.[७] असा उल्लेख डच साधना मध्ये येतो. या सर्व साधनामध्ये उल्लेख पाहता एक बाब स्पष्ट होते की, संभाजी महाराज रागीट, तामसी नसून शांत व संयमी होते. बखरकार व पूर्वकालीन इतिहासकारांनी संभाजी महाराजांची रागीट, उग्रप्रकृती प्रतिमा रेखाटली होती. ती चुकीची ठरते. शांत, संयमी, पराक्रमी संभाजी महाराज सिद्ध होतात.

**निष्कर्ष :**

1. बखर वाङ्मयामध्ये छत्रपती संभाजी महाराजाविषयी अनेक कल्पित घटनांचा उल्लेख सापडतो.
2. या घटनांचा समकालीन कागदपत्रांमध्ये उल्लेख सापडत नाही. तरी इतिहासकारांनी या घटना इतिहास म्हणून स्वीकारल्या आहेत.
3. बदनामीकारक घटनांमुळे संभाजी महाराजांचे अनऐतिहासिक चरित्र निर्माण झाले. छत्रपती संभाजी महाराजांचे बदनामीकारक चरित्र लिहिण्यास बखर वाङ्मयाचा मोठा वाट निदर्शनास येतो-
4. पूर्वकालीन इतिहासकारांनी छत्रपती संभाजी महाराजांवर उग्रप्रवृत्ती, सनकी, तामसी, रागीट, अविवेकीपणाचे आरोप खोटे ठरतात.
5. उत्तरकालीन इतिहासकारांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्राची पुनर्मांडणी केली. यात शांत, संयमी, समजुतदार, विवेकी छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र मांडले.
6. पूर्व कालीन इतिहासकारांनी संभाजी महारांजाच्या चरित्राचे लिखान न्याय बुद्धीने केलेले आढळत नाही.
7. उत्तर कालीन इतिहासकारांनी संभाजी महाराजांच्या चरित्राचे लिखान पुराव्याच्या आधारे न्याय बुद्धिने केले आहे.

**संदर्भ सूची :**


1. सरदेसाई गो. स. मराठी रियासत : उग्र प्रकृति संभाजी, मुंबई, १९७५, पृ. क्र. १००.
2. शिवाजी पत्रसार संग्रह – १९०७, पृ. क्र. ५६५.
3. रानडे म. गो. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष (अनुवाद) फाटक आवृत्ती पहिली मुंबई, १९६४, पृ.क्र. ९१.
4. निकोलस मनुची: असे होते मोगल (अनुवाद) चौबळ ज.स. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (प्रथम आवृत्ती) पृ. क्र. २०८.
5. गोखले कमल : शिवपुत्र संभाजी कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, आवृत्ती सहावी, पृ. क्र. ८२.
6. शिवकालीन पत्रसार संग्रह पत्र क्र. २२६६.
7. डाग रजिस्टार अप्र. दि. २३/०९/१६८०, पृ. क्र. ५७९.